ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ३ जुलै, १९५७ | अंक १७

## विविध माहिती

**दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी नागरिक**—दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनें वर्णभेदाच्या कायद्यास अनुसरून जोहान्सबर्गमधील पश्चिमेच्या भागांतून ९,००० हिंदी नागरिकांना आपलीं बिऱ्हाडें हलविण्याची नोटीस दिली आहे. दक्षिण आफ्रिकेंत २२,००० हिंदी नागरिक असून त्यांची सुमारें ४ कोटी पौंडांची मालमत्ता आहे. त्यांना ह्या कायद्याचा उपसर्ग पोंचणार आहे.

**राजकोट येथें कॉमर्स कॉलेज**—सौराष्ट्रामधील दुसरें कॉमर्स कॉलेज राजकोट येथें उघडण्यांत आलें. कॉलेज गुजरात विद्यापीठाला जोडण्यांत आलें आहे. सांस्कृतिक शिक्षणसमाज ह्या खाजगी संस्थेनें तें काढलें असून राजकोटमधील एका दानशूर गृहस्थानें कॉलेजला १॥ लाखांची देणगी दिली आहे.

**आयुर्वेदावरील जुना ग्रंथ**—म्हैसूर येथील प्राच्य विद्या संशोधन संस्थेला आयुर्वेदावरील एका जुन्या ग्रंथाची प्रत सांपडली आहे. हा ग्रंथ 'पूज्यपाद' ह्या नांवाच्या एका जैन आचार्यानें लिहिलेला असून तो सुमारें १,८०० वर्षापूर्वीचा आहे. मूळ ग्रंथ संस्कृतांत असून त्यावर कानडी टीका आहे.

**प्रे. आयसेनहोअर शेती करणार**—प्रे. आयसेनहोअर ह्यांना भेटण्यासाठीं कांहीं तरुण शेतकरी गेले होते. त्यांच्याशीं बोलतांना, प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं अध्यक्षपदावरून निवृत्त झाल्यावर शेतीचा व्यवसाय करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली.

**भारतामधील भाषांचा अभ्यास**—मॉस्को विद्यापीठांत प्राच्य भाषा शाखेतर्फे भारतामधील भाषांचें शिक्षण देण्यांत येत आहे. संस्कृताची तोंडओळख करून देण्यासाठी एक प्राथमिक पुस्तकहि प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. विद्यापीठांत ३० रशिअन विद्यार्थी भारतीय भाषा शिकत आहेत.

**शारीरिक शिक्षणाचें पहिलें कॉलेज**—भारत सरकारच्या शिक्षण खात्यानें शारीरिक शिक्षण देणारें देशांतील पहिलें कॉलेज ग्वाल्हेर येथें काढण्याचें ठरविलें आहे. कॉलेजचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या स्मृतीप्रीत्यर्थ तें काढण्यांत येत आहे. तें ऑगस्ट महिन्यापासून सुरू होईल.

**वीज विकत घेणें बंद करणार**—पाकिस्तानांतील लाहोर-ल्यालपूर भागाला भारतामधील जोगेंद्र नगर विद्युत्केंद्रांतून तीन ते चार हजार किलोवॅट विजेचा पुरवठा करण्यांत येतो. पाकिस्तानांतील दाऊदखेल येथील विजेचा पुरवठा घेऊन भारताची वीज घेण्याचें बंद करण्याचा पाकिस्तानचा विचार आहे.

**मीठ करण्याच्या पद्धति**—भारतामधील मिठागरांतून मीठ तयार करण्याच्या ज्या पद्धति वापरण्यांत येतात त्यांचा अभ्यास करण्यासाठीं चीनमधील तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत आलें होतें. त्यानें आपला भारताचा दौरा पुरा केला असून भारतांत अभ्यास केलेल्या कांहीं पद्धति चीनमध्यें अनुसरण्याची शिफारस केली आहे.

**रशिआंत नवीं विद्युत्केंद्रें**—रशिअन सरकारनें उरल पर्वत, युक्रेन आणि सायबेरिआ ह्या भागांत विद्युत् उत्पादनाचीं प्रचंड केंद्रें उभारण्याचें ठरविलें आहे. सध्यां रशिआंत विद्युत् उत्पादनाचीं जीं केंद्रें आहेत त्यांच्यापेक्षा ह्या नव्या केंद्रांतून दुप्पट वीज निर्माण करण्यांत येणार आहे.

**पळून गेलेले हंगेरिअन नागरिक**—गेल्या ऑक्टोबरमध्यें हंगेरींत जो सरकारविरोधी उठाव झाला त्यामुळें १,८५,००० हंगेरिअन नागरिकांनीं देशत्याग केला, अशी माहिती संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत प्रकाशित करण्यांत आली आहे. ह्या उठावामुळें हंगेरींत दोन वर्षांत जितकी लोकसंख्या वाढते तितक्या लोकसंख्येला तो देश मुकला.

**भावी एंजिनिअराची पृच्छा**—भारतामधील कित्येक एंजिनिअरिंगचे पदवीधर बेकार असतांना ठिकठिकाणच्या एंजिनिअरिंग कॉलेजांतील शिकाऊ विद्यार्थ्यांची संख्या कां वाढविण्यांत येत आहे, अशी पृच्छा मद्रासमधील एका भावी एंजिनिअरनें केली आहे.

**कृत्रिम उपग्रहांचा वेध**—रशिआ व अमेरिका हीं दोन राष्ट्रें अंतराळांत कृत्रिम उपग्रह सोडण्याचा प्रयत्न करणार आहेत. हे उपग्रह ज्या वेळीं सोडण्यांत येतील त्या वेळीं त्यांचा वेध घेण्याची व्यवस्था नैनिताल येथील वेधशाळेंत करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं लागणारीं यांत्रिक उपकरणें अमेरिका पुरविणार आहे.

**कलकत्त्यामधील बस सर्व्हिस**—पश्चिम बंगाल सरकारनें कलकत्ता शहरांतील बसची वाहतूक तीन वर्षांच्या कालावधींत संपूर्णपणें आपल्याकडे घेण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें ज्या खाजगी बसमालकांचें नुकसान होईल त्यांना शहराच्या बाहेरील कांहीं मार्गांवर वहातूक करण्याची सवलत देण्यांत येणार आहे.

**सहकारी शेतकी संस्थांना उत्तेजन**—मद्रास राज्यांत ज्या ठिकाणीं समाजविकास योजना अमलांत आणण्यांत येत आहेत त्या भागांतून सहकारी शेतकी संस्थांना उत्तेजन देण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. सहकारी शेतीसंबंधीची माहिती खेड्यांत पुरवून अशा संस्थांना आर्थिक मदत देण्याची व्यवस्थाहि करण्यांत येणार आहे.

## भारतांतील सहकारी संस्थांचा संसार

सहकारी संस्थांच्या संसाराबाबत १९५५–५६ चे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यावरून खालीलप्रमाणें प्रगति दिसून येते :—

| | १९५४–५५ | १९५५–५६ |
|---|---|---|
| सर्व तऱ्हेच्या सहकारी संस्था | २,१९,२८८ | २,४०,३९५ |
| संख्येंत वाढ | | ९·६% |
| खेळत्या भांडवलांत वाढ | | २०·१% |
| शेतकी पतपेढ्यांचें एकूण प्राथमिक सोसायट्यांशीं प्रमाण | | ६७·६% |
| शेतकी पतपेढ्यांचें एकूण प्राथमिक शेती सोसायट्यांशीं प्रमाण | | ८०·५% |
| सहकारी कक्षेतील लोकसंख्या (पांच माणसांचें कुटुंब धरून) | २१% | २२·८% |
| प्राथमिक सोसायट्यांनीं दिलेल्या कर्जांत वाढ | | २७% |
| कर्जाशीं थकबाकीचें प्रमाण | १७% | १५·१% |
| राज्य सहकारी बँका | २४ | २४ |
| त्यांचें वसूल भांडवल | ३·२३ कोटी रु. | ४·३७ कोटी रु. |
| त्यांचे रिझर्व्ह फंड | ३·३१ ,, | ३·२८ ,, |
| भाग भांडवलांपैकी सरकारी भागभांडवल | १२६·०४ लक्ष रु. | १८८·०४ लक्ष रु. |
| केंद्रीय बँकांचें खेळतें भांडवल | ४७·६२ कोटी रु. | ६३·२ कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ५०·२४ ,, | ६७·८९ ,, |
| मध्यवर्ती बँका | ४७१ | ४७८ |
| त्यांचें खेळतें भांडवल | ७३·६९ कोटी रु. | ९२·६७ कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ५०·३२ ,, | ७०·४० ,, |
| त्यांनीं व्यक्तींना दिलेलीं कर्जें | १७·८५ ,, | ९·४४ ,, |
| शेतकी पतपेढ्या | १,४३,३२० | १,५९,९३९ |
| त्यांचे सभासद | ६५·७ लक्ष | ७७·९ लक्ष |
| त्यांचें खेळतें भांडवल | ६२·९३ कोटी रु. | ७९·१० कोटी रु. |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ३५·४८ ,, | ४९·६२ ,, |
| बिगर शेती सोसायट्यांचें खेळतें भांडवल | ७८·३२ ,, | ८५·७४ ,, |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | ६२·१२ ,, | ७२·०६ ,, |
| मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांनीं दिलेलीं कर्जें | २·४३ ,, | २·८३ ,, |
| प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची संख्या | २९२ | ३०२ |
| त्यांनीं दिलेलीं कर्जें | १·४५ कोटी रु. | १·७४ कोटी रु. |
| प्राथमिक बिगर शेतकी नॉन-क्रेडिट सोसायट्यांचा नफा किंवा तोटा | ८९·५३ लक्ष रु. तोटा | ७१·५९ लक्ष रु. नफा |
| राज्य व मध्यवर्ती नॉन क्रेडिट सोसायट्यांचा नफा | ४९·२३ ,, | १२३·५३ ,, |

### देशी मालाची सरकारकडून अधिक प्रमाणांत खरेदी

दि डायरेक्टोरेट–जनरल ऑफ सप्लाईज अँण्ड डिस्पोजल्स-मार्फत भारत सरकार खरेदी करीत असलेल्या देशी मालाच्या प्रमाणांत गेलीं चार वर्षें सतत वाढ होत आहे. १९५६–५७ मध्यें या खात्यानें खरेदी केलेल्या एकूण १८० कोटी रुपये किंमतीच्या सामग्रीपैकी ९३ कोटी रुपये किंमतीचा माल देशी होता. १९५३–५४, १९५४–५५ व १९५५–५६ मध्यें या खात्यानें अनुक्रमें ७२, ७९ व १२१ कोटी रुपये किंमतीची सामग्री खरेदी केली होती. त्यांत देशी माल अनुक्रमें ३८, ४७ व ७६ कोटी रुपये किंमतीचा होता.

त्याचप्रमाणें, घरगुती व छोट्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांत तयार झालेल्या मालाच्या खरेदींतहि याचप्रमाणें वाढ होत आहे. १९५५–५६ मध्यें ११८ लाख रुपये किंमतीची खादी सरकारनें खरेदी केली. १९५२–५३ चा हा आंकडा २७ लाख रुपये होता. इतर घरगुती व छोट्यां उद्योगधंद्यांत झालेल्या मालापैकी १९५६ ५७ मध्यें २२३ लाख रुपये किंमतीचा माल या खात्यानें घेतला. १९५२–५३ चा हा आंकडा ३९ लाख रुपये होता.

---

### १५ ते १६ ऑगस्ट रोजीं पगारी रजा देण्याची मालकवर्गाला विनंती

यंदा, भारताच्या स्वातंत्र्याचीं १० वर्षें पूर्ण होतात. त्याप्रीत्यर्थ व भारताच्या पहिल्या राष्ट्रीय चळवळीच्या शंभराव्या वाढदिवस–समारंभानिमित्तानें भारतांत आणि पॉंडेचरी राज्यांत १५ व १६ ऑगस्ट हे सार्वजनिक सुट्टीचे दिवस राहातील असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे. इतर मालकवर्गाहि हे दोन राष्ट्रीय दिवस भरपगारी सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर करून सहकार्य देतील अशी सरकारला आशा आहे.

---

### साखरेचें उत्पादन

चालू हंगामांत ३१ मे, १९५७ पर्यंत १९·७५ लाख टन साखरेचें उत्पादन होऊन, १२·२७ लाख टन साखरेची रवानगी करण्यांत आली. मागील वर्षांतील हेच आंकडे अनुक्रमें १७·८६ व ९·५४ लाख टन असे होते. ३१ मे, १९५७ रोजीं साखर-कारखान्यांकडे १२·७१ लाख टन साखर शिल्लक होती. गत-वर्षीचा हाच आंकडा १२·४१ लाख टन होता.

---

**साखरेचें उत्पादन व निर्यात**—उत्तर प्रदेशांत सहकारी तत्त्वावर चालणारा साखरेचा नवा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याचें भांडवल २ कोटी रुपयांचें असेल. ह्या वर्षी साखरेचें उत्पादन २० लाख टन झालें. त्यापैकी १,२०,००० टन साखर परदेशीं निर्यात करण्यांत आली. निर्यातीमुळें भारताला परदेशीय हुंडणावळ मिळते.

**गौहत्ती शहराचा वीज–पुरवठा**— आसामच्या राज्य सरकारनें गौहत्ती इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशन ही कंपनी आपल्या ताब्यांत घेतली आहे. ही कंपनी गेलीं २० वर्षें शहराला विजेचा पुरवठा करीत होती. खाजगी मालकीच्या कंपनीचें राष्ट्रीयीकरण केल्याचें आसाममधील हें पहिलेंच उदाहरण आहे.

**रेल्वे सिग्नलिंगची शाळा**—येत्या ऑक्टोबरच्या अखेरीला हैदराबाद शहराच्या लालगुड्डा भागांत रेल्वे सिग्नलिंग शिकविण्याची शाळा स्थापन करण्यांत येणार आहे. संस्था स्थापन करण्यासाठी १०·५ लाख रुपये खर्च येईल व त्यांत १०० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय करण्यांत येईल.

# अर्थ

बुधवार, ता. ३ जुलै, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीयांना मोटारींतून फिरण्याची सवलत

रशिआंत गेलेल्या प्रवाशांना मोकळेपणीं हिंडूं-फिरूं देण्यांत येत नाहीं असा प्रवाद ऐकूं येतो. ह्या बाबतींत रशिअन राज्यकर्त्यांनीं आपलें धोरण बदललेलें दिसत आहे. अमेरिकन मोटारवाल्यांना रशिआंत प्रवासस्वातंत्र्य देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्यासंबंधीं सरकारनें जी योजना जाहीर केली आहे तिचा फायदा घेऊन अमेरिकन हौशी प्रवाशी आपल्या खाजगी मोटारींतून रशिआच्या युरोपमधील भूप्रदेशांत वाटेल तसा प्रवास करूं शकतील. अजूनहि रशिआचा जो भाग आशिआ खंडांत आहे त्यांतून प्रवास करण्याची परवानगी देण्यांत येत नाहीं. तथापि पूर्वीच्या मानानें रशिअन सरकारचें धोरण अधिक उदार झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हौशी प्रवाशांना सवलती देण्यानें राष्ट्राराष्ट्रांतील गैरसमज दूर होण्यास व परस्परांविषयीं स्नेहभाव उत्पन्न होण्यास मदत होते हें तर खरेंच; पण अमेरिकन प्रवासी परदेशांत गेल्यास त्या देशांना डॉलर्सची प्राप्ति होते हें लक्षांत घेतलें पाहिजे. आजच्या जगांत डॉलर्सचा भाव फार आहे हें सांगण्याचें कारणच नाहीं. रशिआंत ४ रुबल्सला १ अमेरिकन डॉलर असा दर अधिकृत म्हणून ठरविलेला आहे. पण अमेरिकन प्रवाशांना रशिअन माल खरेदी करावयाचा असेल तर एका डॉलरला दहा रुबल्स देण्यांत येणार आहेत. मोटार चालविण्याचे आंतरराष्ट्रीय परवाने रशिआनें मान्य केले आहेत. मात्र मोटार मालकांनीं आपल्या मोटारीस लागणारे सुटे भाग बरोबर आणावे, असें सुचविण्यांत आलें आहे.

---

## भारतामधील मोटारींचें उत्पादन

भारतामधील मोटारींच्या उत्पादनांत १९५५ च्या मानानें ४० टक्के वाढ झाली आहे. १९५५ सालीं २३,०८४ मोटारींचें उत्पादन करण्यांत आलें होतें. १९५६ सालीं मोटारींच्या उत्पादनाचा आंकडा ३२,१३८ पर्यंत आला. १९५३ सालापासून देशांतील मोटारींचें उत्पादन हळूहळू वाढत चाललें आहे. टॅरीफ कमिशननें केलेल्या शिफारशीस अनुसरून १९५३ सालापासून मोटारी व ट्रक्स ह्यांचें उत्पादन देशांतच करण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें. १९५३ सालीं एकूण १३,९२६ मोटारी तयार करण्यांत आल्या. १९५४ सालीं १४,४६२ मोटारी तयार करण्यांत आल्या. मोटारींच्या धंद्याबाबत अनुसरण्यांत आलेल्या धोरणाप्रमाणें संपूर्ण मोटारी भारतांत आयात करूं दिल्या जात नाहींत. निरनिराळ्या प्रकारच्या ज्या मोटारी तयार करण्यांत येतात त्यांच्यांत उत्तरोत्तर कमी प्रमाणांत परदेशांत तयार झालेले भाग वापरण्यांत येतील अशी दक्षता घेतली जाते. १९५६ सालीं तयार करण्यांत आलेल्या मोटारींचें वर्गीकरण असें आहे:—मोटारी १२,९८९, स्टेशन वॅगन्स ६७७, जीप व तत्सदृश गाड्या ४,३२८ आणि मालवाहू मोटारी १४,१४४. भारतांत मोटारींना व मालवाहू ट्रक्सना मागणीहि वाढती आहे. १९५४ सालीं १३,८१३ मोटारींची विक्री करण्यांत आली. १९५५ सालीं २६,०६५ मोटारी विकण्यांत आल्या. १९५६ सालीं ३१,४८६ मोटारी विकण्यांत आल्या. १९६०—६१ च्या सुमारास मोटारींची मागणी दरसाल ६५,००० च्या घरांत जाईल असा अंदाज आहे. मोटारी तयार करणारे सहा कारखाने आहेत. ते सर्व मिळून दरसाल ४९,८०० मोटारी तयार करूं शकतील. धंद्यांत गुंतलेलें भांडवल १७·३ कोटी रुपये आहे.

---

## नागपूरमधील जिनिंग फॅक्टरींवर संकट

नागपूर जिल्ह्यांतील जिनिंगच्या कारखान्यांना कापसाच्या टंचाईमुळें कठीण परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. कापसाच्या पिकाखाली असलेली जमीन अधिकाधिक प्रमाणांत संत्र्यांचें पीक काढण्यासाठी वापरण्यांत येऊं लागल्यामुळें कारखान्यांना पुरेसा प्रमाणांत कापूस मिळेनासा झाला आहे. त्यामुळें बरेच कारखाने बंद करावे लागत आहेत अगर दुसरीकडे हलवावे लागत आहेत. खुद्द नागपूरमध्यें एके काळीं २२ कारखाने होते व त्यांत ३०० जिनिंगचीं यंत्रें होतीं. कारखान्यांचें भांडवल २४ लाखाच्या जवळपास होतें. आतां अवघे पांच कारखाने चालूं आहेत. नागपूरमधील कापडाच्या गिरण्यांना ह्याच कारखान्यांकडून संस्कारित कापसाचा पुरवठा होत असे. ह्या गिरण्यांनाहि आतां कापूसपुरवठ्याची अडचण भासूं लागली आहे. नागपूर हें शहर कापसाच्या व्यापाराचें एक महत्त्वाचें केंद्र आहे. हंगामामध्यें नागपूरच्या कापूसबाजारांत ४०,००० गाड्या कापूस येत असे. बाजारांत आलेल्या कापसांतील सरकी काढून त्याच्या गांसड्या बांधण्याचें काम कारखाने करीत असत. दरवर्षी सुमारें १,००,००० गांसड्या कापूस गिरण्यांना पुरविण्यांत येत असे. परंतु आतां जेमतेम २०,००० गांसड्या कापूसच पुरविण्यांत येऊं लागला आहे. ह्या भागांत ५,००,००० एकर जमिनींत कापूस पिकविण्यांत येत असे. आतां ह्या जमिनींपैकी निदान निम्मी जमीन तरी संत्र्यांच्या लागवडीसाठी कसली जाऊं लागली आहे. १९१० सालीं २,००० एकर जमिनींत संत्रीं लावण्यांत येत असत. १९५१ सालीं सुमारें ३१,००० एकरांत संत्रीं लावण्यांत आलीं.

---

**राजकोट येथें तांत्रिक शिक्षणाची शाळा**— राजकोट येथें तांत्रिक शिक्षण देण्याची एक शाळा काढण्याचे प्रयत्न सांस्कृतिक शिक्षणसमाज ह्या संस्थेतर्फें करण्यांत येत आहेत. संस्थेंत पांचवी इयत्ता पास झालेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल व त्यांना तांत्रिक शिक्षणाचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पुरा करावा लागेल.

**संस्कृत हस्तलिखिताचा आढळ**—चीनमधील युनान प्रांतांतील एका देवळांत बुद्धधर्माविषयींचे ३,००० हस्तलिखित ग्रंथ सांपडले आहेत. सर्व ग्रंथ दुर्मिळ असून त्यांतील कांहीं चिनी भाषेंत व कांहीं संस्कृत भाषेंत लिहिलेले आहेत. हस्तलिखितें सन १३६८ तें १६४४ ह्या कालांतील आहेत.

## टाटा कंपनीच्या पोषक धोरणाच्या राजकीय पक्षांना मदत

### मेमोरँडम दुरुस्तीस हायकोर्टाची मंजुरी परंतु प्रसिद्धीची नवी अट

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें आपल्या मेमोरँडममध्यें दुरुस्ती केली, तिला कंपनी कायद्याच्या १७ व्या कलमान्वयें मुंबई हायकोर्टानें मंजुरी दिली होती. कंपनीच्या मतें जो राजकीय पक्ष उद्योगधंद्यांचें, विशेषतः टाटा कंपनीच्या उद्योगधंद्याचें हित पाहात असेल, त्याच्या फंडाला कंपनी साहाय्य करूं शकेल, अशा अर्थाची ती दुरुस्ती होती.

कंपनीचें भांडवल २७ कोटी रु. असून कंपनी आणखी ७५ कोटी रु. खर्चून वाढीचा कार्यक्रम पार पाडण्याच्या विचारांत आहे. तेव्हां पोलादाचा धंदा खाजगी क्षेत्रांतच कायम रहावा, असें जें सरकार ठरवील त्याला पाठिंबा देणें कंपनीच्या हिताचें होईल. अनुकूल पक्षांच्या फंडाला मदत करण्याचा कंपनीला स्पष्ट अधिकार असावा, हा तिचा सरळ हेतु आहे.

मुंबई हायकोर्टानें ( न्या. तेंडोलकर ) कंपनीला मेमोरँडममध्यें बदल करण्यास परवानगी दिली. "एकाद्या उमेदवारानें किंवा पक्षानें स्वतःच्या मताविरुद्ध वागून कंपनीला पोषक असें धोरण ठेवण्यासाठी कंपनीनें त्याला पैसे देणें हें सार्वजनिक हिताचें होणार नाहीं. पण, जो उमेदवार किंवा जो पक्ष कंपनीला पोषक असें धोरण अगोदरच ठेवत असेल, त्याला कंपनीनें मदत करण्यास हरकत नाहीं," असा श्लेष न्यायमूर्तींनीं काढला आणि कंपनीचें धोरण सार्वजनिक हिताविरुद्ध आहे असें एकाद्याहि भागीदाराला वाटलें तर त्यानें कोर्टात कंपनीविरुद्ध इंजंक्शन मागावें, असें सुचविलें.

कंपनी कायद्याच्या २९३ व्या कलमाप्रमाणें, कंपनीचे डायरेक्टर २५,००० रु. किंवा पूर्वीच्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या ५% इतकी रक्कम देणगीदाखल देऊं शकतात; त्याला भागीदारांची संमति आवश्यक नाहीं; जास्त रकमेला मात्र ती आवश्यक आहे. टाटा कंपनीचा वार्षिक सरासरी नफा सुमारें ३ कोटी रु. आहे. तेव्हां, कंपनी वरील कलमाप्रमाणें भागीदारांची संमति न घेतां १५ लक्ष रु., व त्यापेक्षा जास्त रक्कम त्यांच्या संमतीनें, देऊं शकते.

### अपील कोर्टानें घातलेली प्रसिद्धीची अट

ह्या निर्णयावर तिघा शेअरहोल्डर्सनीं अपील केलें, परंतु सरन्यायाधीश व न्यायमूर्ति देसाई ह्यांनी मेमोरँडममधील दुरुस्तीची मंजुरी कायम केली. एक अट मात्र त्यांनीं घातली, ती अशी कीं, दर वर्षअखेर कंपनीनें दिलेल्या वर्गण्यांचा पूर्ण तपशील दोन प्रमुख वृत्तपत्रांत प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्यांपैकी एक वृत्तपत्र मुंबईमधील असलें पाहिजे.

"व्यक्तीप्रमाणें कंपन्यांनीहि राजकीय पक्षांना मदत करण्यांत गैरकायदा कांहींच नाहीं. मेमोरँडममध्यें दुरुस्ती नामंजूर करण्यांत आली, तर कंपनी स्वतःची पुनर्घटना करून व नवा मेमोरँडम तयार करून स्वतःकडे राजकीय पक्षांना मदत करण्याचा अधिकार घेऊं शकतेच. कित्येक नव्या कंपन्यांनीं आपल्या मेमोरँडममध्यें असा अधिकार घेऊन ठेवलेलाच आहे. खालच्या कोर्टानें मेमोरँडम दुरुस्तीस मंजुरी दिली तेव्हां कंपनीवर अट घातली, कीं तिनें अशा वर्गण्यांचा तपशील नफा-तोटापत्रकांत व ताळेबंदांत दाखविला पाहिजे. राजकीय पक्षाला आर्थिक मदत कोणाकडून व किती मिळते, हें मतदारांना माहीत असणें आवश्यक आहे. म्हणून, टाटा कंपनीनें दिलेल्या वर्गणीचा तपशील दोन प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केला गेला पाहिजे.

### पार्लमेंटला इशारा

"कंपन्यांना राजकीय पक्षांना वर्गणी देण्याचा अधिकार असणें धोक्याचें आहे, असा इशारा पार्लमेंटला देणें अगत्याचें आहे. हा धोका वाढत जाऊन लोकशाही त्यामुळें संपुष्टात येण्याचा संभव आहे. अनुभव असा सांगतो, कीं डायरेक्टर लोक वर्गण्या देऊन टाकतात आणि कंपनीची मंजुरी ही एक केवळ मामुली बाब असते. कारण, डायरेक्टरच्या ताब्यांतच कंपनी असते किंवा एकाद्या व्यक्तीजवळ बरेचसे शेअर्स असतात. कंपन्यांनीं राजकीय पक्षांना द्यावयाच्या मोठ्या वर्गण्यांना तरी कोर्टाची मंजुरी पार्लमेंटानें आवश्यक करावी व त्यादृष्टीनें पार्लमेंटानें कायदा दुरुस्त करावा."

---

## कलकत्ता बंदरांत बोटींची दाटी झाली

सुएझचा कालवा वाहतुकीला खुला झाल्यापासून कलकत्ता बंदरांत येणाऱ्या बोटींची संख्या वाढूं लागली आहे. सामान्यपणें बंदरांत ५० ते ६० बोटी माल चढविण्या-उतरविण्यासाठी उभ्या असतात. परंतु बंदरांत काम करणाऱ्या कांहीं कामगारांनीं आपल्या कामाचा वेग कमी केल्यामुळें गेल्या कांहीं दिवसांत ८२ बोटी बंदरांत खड्या आहेत. मालाच्या चढ-उतारांत अडथळा उत्पन्न झाल्यामुळें बंदरांत बोटींची अतिशय गर्दी झालेली आहे. बहुतेक बोटींतून भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणारें अवजड यंत्रसाहित्य आहे. कारखान्यांची यंत्रसामुग्री, रेल्वेचीं एंजिनें, तेलाच्या वाघिणी व लोखंड-पोलाद अशा प्रकारचा हा माल असून तो लवकर उतरून घेणें अगत्याचें आहे. बंदराचे अधिकारी मालाचा चढ-उतार झटपट व्हावा म्हणून खूप खटपट करीत आहेत. त्यासाठी फिरत्या याऱ्या व इतर यंत्रसामुग्री वापरण्यांत येत आहे. लोखंड व पोलादाचा माल साठविण्यासाठी एक वखारहि बांधण्यांत आली आहे. सध्यां बंदरांत कामगारांचा तुटवडा आहे. पण कामगार त्याचा फायदा घेण्यास उत्सुक दिसत नाहींत. बंदरांतील कामगारांना ज्या पद्धतीनें रोजगार देण्यांत येतो त्याची तपासणी करण्यासाठी भारत सरकारच्या वाहतूक खात्यानें एक खास अधिकारी नेमला आहे. कलकत्ता बंदरांतून निरनिराळ्या खनिजांची मांती मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यांत येते. ह्या कामांतहि व्यत्यय आला आहे. कामगारांनीं हळूं काम करण्याचें ठरविल्यामुळें बंदराचें महत्त्व कमी होण्याचा संभव आहे.

---

## सेक्रेटरींच्या शिक्षणवर्गाचा समारोप

मुं. प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें नगर जिल्हा सहकारी बोर्डानें, ता. १५-४-१९५७ पासून सात आठवडे शिर्डी ता. कोपरगांव येथें चालविलेल्या सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या शिक्षणवर्गाचा समारोपसमारंभ ता. ९-६-५७ रोजीं साजरा झाला. अध्यक्षस्थानीं राहाता सहकारी साखर कारखान्याचे मॅ. डायरेक्टर, श्री. बाबूराव कद्दू पाटील हे होते. नगर जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट को-ऑप. ऑफिसर व गांवांतील प्रतिष्ठित मंडळी समारंभास हजर होती. त्या प्रसंगीं अनेक वक्त्यांचीं सेक्रेटरींना मार्गदर्शनपर भाषणें झालीं. सरतेशेवटीं या जिल्ह्याचे को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख यांनीं सर्वांचे आभार मानले. नंतर चहा-पान, पानसुपारी होऊन हा समारंभ आटोपला.

## न्यूयॉर्कमधील महाराष्ट्रीय पति-पत्नी व्यापारी

श्री. शं. कृ. व सौ. इंदुताई मराठे

( मागील अंकावरून चालू )

धंद्यांतील अडचण सांगतांना श्री. मराठे म्हणाले, "येथें धंदा करण्याला मुख्य अडचण भांडवलाची जाणवते. या देशांत सर्वच पैदास ही मोठ्या किंबहुना प्रचंड प्रमाणावर होते, व तशी पैदास करावयाची म्हणजे भांडवलहि त्या प्रमाणांत लागतें. येथील गिऱ्हाईक कमालीचें नावीन्यप्रिय आहे, व तुम्ही जी कोणती नवीन आकर्षक टूम काढाल, ती तुम्हांला कांहीं दिवस तरी लाखों डॉलर्स मिळवून देईल. कारण, लोक जसे उत्साही आणि हौशी आहेत, तशीच त्यांची क्रयशक्तीहि जबरदस्त आहे. येथें बायका तर प्रत्येक आठवड्याला नवे कपडे आणि नवी कॉस्च्यूम ज्युवेलरीसारखी घेत असतात. हिंदुस्थानांतील तऱ्हतऱ्हेचे दागिने, कापडांचे नानाविध प्रकार, गृहमंडळाच्या वस्तु, खेळणीं, वगैरे मालाला येथें भरपूर मागणी आहे. पण तोच तो माल मात्र फार दिवस खपणें शक्य नाहीं. मालाचें स्वरूप सतत बदलत राहिलें पाहिजे, त्यांत कांहीं ना कांहीं नवलाई सारखी गिऱ्हाइकाच्या दृष्टीस पडली पाहिजे. मालाची नवलाई आणि पुरवठा या दोहोंसाठी भरपूर भांडवल हाताशीं पाहिजे. माझ्या डोळ्यांपुढे सारख्या नव्या कल्पना, नव्या योजना येत असतात. पण भांडवलाच्या अभावीं मी पंगु होऊन बसलों आहें. येथील बाजारपेठेंत टिकावयाचें म्हणजे महामूर भांडवल हाताशीं सारखें खेळतें हवें. या शहरांत तुम्हांला जवळ जवळ सर्व देशांतल्या लोकांनीं काढलेलीं उपाहारगृहें दिसून येतील, व चिनी लोकांचीं उपाहारगृहें तर या देशांतल्या अगदीं लहानसहान शहरांत सुद्धां आहेत. लॉस अँजेलिस, सान्फ्रान्सिस्को, बोस्टन, शिकागो, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन इत्यादि मोठ्या शहरांतून तर तुम्हाला 'चायना टाऊन' हटकून आढळेल. पण हिंदी लोकांनीं चालविलेलें उपाहारगृह मात्र तुमच्या नजरेस सहसा पडणार नाहीं! चिनी लोकांनीं आपलीं पक्वान्नें आणि कलाकौशल्य हीं दोन्हीं या देशांत लोकप्रिय करून या देशाच्या व्यापारांत आणि जीवनांत कायमचें स्थान प्राप्त करून घेतलेलें आहे; व प्रत्येक मोठ्या शहरीं त्यांच्या स्वतंत्र वसाहती आणि स्वतःच्या चिनी भाषेंत चालविलीं दैनिकेंहि आहेत. त्या मानानें गेलीं दीडशें वर्षें अमेरिकेशीं हिंदुस्थानचा निकट संबंध आलेला असूनहि आपली छाप इथें कोणत्याच बाबतींत पडलेली नाहीं. नाहीं म्हणावयाला स्वामी विवेकानंद यांच्या स्फूर्तीनें स्थापन झालेली 'वेदान्त चर्चेस' मात्र या देशांतील मोठ्या शहरांतून आहेत. त्याच्या व्यतिरिक्त आपल्या प्रभावाची कोणतीहि खूण या देशांत निदर्शनाला येणार नाहीं. या परिस्थितीचा विचार आपल्यांतील कार्यकर्त्यांनीं आणि व्यापाऱ्यांनीं करावयाला हवा.

"दुसरी अडचण अर्थातच या देशांतील जबरदस्त सरकारी करांची! आठवड्याला अकरा डॉलरांच्यावर तुमचें उत्पन्न गेलें, म्हणजे तुमच्यावर इन्कमटॅक्स बसलाच म्हणून समजा! नऊ वर्षांपूर्वी मीं येथें २०,००० डॉलरांना घर घेतलें. त्याचा दरमहा ६१ डॉलर कर मला भरावा लागतो. घरावर तर सरकारी कर आहेच, पण घरापासून मिळणाऱ्या भाड्याच्या उत्पन्नावरहि सरकारी कर आहे. दहा लाख डॉलर उत्पन्नावर ९१ टक्के इन्कमटॅक्स आहे. एवढें सांगितल्यानें तुम्हांला येथील करांच्या स्वरूपाची कल्पना येईल. अपुरें भांडवल आणि डोईजड कर यामुळें माझ्यासारख्या परदेशांतून आलेल्या गरीब माणसाला या देशांत आपला जम बसवणें फार कठीण जातें. शिवाय, इमिग्रेशनच्या नवीन निर्बंधामुळेंहि आतां वाटेल त्याला या देशांत येणें आणि स्थायिक होणें सोपें राहिलेलें नाहीं. तरीसुद्धां मी असें म्हणेन कीं, लोकसंख्येची मुंग्यासारखी गर्दी आणि बेकारी असलेल्या आपल्या देशांत कुचंबत जीवन कंठण्यापेक्षा या देशांत येऊन स्वतःच्या चिकाटीच्या, धडाडीच्या आणि मेहनतीच्या जोरावर नशीब काढणें हें केव्हांहि श्रेयस्कर ठरेल. आपल्या शेजारच्या चिनी लोकांना जें शक्य झालें, तें आपल्याला कां होऊं नये? विशेषतः आतां आपला देश स्वतंत्र झालेला असल्यामुळें तर, लोकांनीं जास्तींत जास्त प्रमाणांत नशीब काढण्यासाठी परदेशीं जावें आणि आपल्या सरकारनें त्यांच्या उद्योगांना शक्य तितका हातभार लावावा, यांतच आपल्या देशाची प्रगति आणि हित आहे."

—"तरुण भारत" वरून, १२-६-५६

**चोरलेल्या मोटारीची चार वेळां विक्री**—गेल्या नोव्हेंबरमध्यें कलकत्ता शहरांतून २०,००० रुपये किंमतीची एक भारी गाडी चोरण्यांत आली होती. ह्या गाडीचा पत्ता पोलिसांना पूर्व पंजाबांतील एका शहरांत लागला. गुन्ह्याची चौकशी करतांना गाडी ह्यापूर्वी चार वेळां विकण्यांत आली आहे असें आढळून आलें.

**रेल्वेच्या विकासासाठी कर्ज**—जागतिक बँक व भारत सरकार ह्यांच्या दरम्यान भारतामधील रेल्वेच्या विकासासाठी कर्जाच्या वाटाघाटी चालू आहेत. आतां ह्या वाटाघाटी बऱ्याच प्रगत स्वरूपांत आल्या आहेत. अजून कर्जाचा नक्की आकडा ठरलेला नसला तरी सुमारें ७·५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर होईल असा अंदाज आहे.

**संस्थानिकांवर महसूल कर**—ओरिसाच्या सरकारनें राज्यांतील संस्थानिकांच्या ज्या जमिनींवर आतांपर्यंत जमीन महसूल घेण्यांत येत नव्हता, त्या जमिनींवर तो ह्यापुढें घेण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी राज्याच्या विधानसभेंत एक खास बिल मांडण्यांत येणार आहे.

**शेतीच्या मालासाठी वखारी**—मुंबई राज्यांतील पांच सहकारी संस्थांनीं शेतीचा माल सांठविण्यासाठी वखारी बांधल्या आहेत. आणखी चार सहकारी संस्था अशाच वखारी बांधणार आहेत. ह्या संस्थांना इंडियन सेंट्रल ऑइलसीड्स कमिटीनें राज्य सरकारमार्फत १ लाख रुपयांचें कर्ज दिलेलें आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भू-विज्ञानाच्या प्रगतीची पूर्वतयारी

### ज्ञानाचीं नवीं दालनें खुलीं होणार

पृथ्वी व तिच्या भोंवतालचें वातावरण ह्याविषयींचें अज्ञान दूर करण्याचा महान् प्रयत्न १ जुलैपासून जगभर सर्वत्र सुरू झाला आहे. ह्या जागतिक संशोधन-कार्यात ७० राष्ट्रांतील ५०,००० शास्त्रज्ञ सामील होणार आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार्यानें पाळण्यांत येणाऱ्या या भू-वैज्ञानिक संवत्सरांत विरोधी राष्ट्रेंहि एकत्र येणार असल्यानें स्नेहभावाचा नवाच मनु सुरू होत आहे.

१ जुलै, १९५७ पासून ३१ डिसेंबर १९५८ अखेर, सुमारें ७० राष्ट्रांतील ५०,००० पेक्षा अधिक शास्त्रज्ञ सहकार्यानें जागतिक स्वरूपाच्या भू-वैज्ञानिक (जिओफिजिकल) संशोधन-कार्यात भाग घेणार आहेत. ह्या अठरा महिन्यांच्या काळाला "आंतरराष्ट्रीय भू-वैज्ञानिक संवत्सर" (इंटरनॅशनल जिओफिजिकल इयर) "आय्. जी. वाय्." असें नांव देण्यांत आलेलें आहे. वेगवेगळ्या उपकरणांनीं सुसज्ज असलेल्या अग्निबाणां-(रॉकेटां)च्या व कृत्रिम उपग्रहांच्या साहाय्यानें पृथ्वीभोंवतालच्या वातावरणाचा विशेषतः त्याच्या वरच्या थरांचा अभ्यास करणें, हा त्या संवत्सराचा एक प्रमुख उद्देश आहे.

### पृथ्वीभोंवतालचें वातावरण

पृथ्वीभोंवतालच्या वातावरणाचे चार थर आहेत. आपण ज्या दाट हवेच्या पट्ट्यांत राहातों तो सर्वांत खालचा चलद्‌वरण (ट्रॉपोस्फिअर) होय. त्यावर स्तरावरण (स्ट्रॅटोस्फिअर), त्यावर दलावरण (आयनोस्फिअर) आणि त्याच्याहि वर एक्झोस्फिअर, अशीं आवरणें आहेत. त्यापैकीं सर्वांत खालच्या म्हणजे चलद्वावरणाच्या पहाणीमुळें जी माहिती उपलब्ध होईल, तिच्या योगानें विमानवाहतुकीला पोषक अशीं बरींच तत्त्वें उघडकीला येतील अशी अपेक्षा आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या वर १० पासून ते १५ मैलांपर्यंतच्या स्तरावरणाच्या थरांतील ओझोनविषयक संशोधन महत्त्वाचें ठरेल.

त्यावरील पट्टा दलावरणाचा. हें वातावरण लांब अंतरांच्या रेडिओ दळणवळणाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे आणि ह्या विभागांत संशोधन करण्यासाठी अनेक अग्निबाण पाठविण्यांत येणार आहेत. पृथ्वीवरून धाडण्यांत येणाऱ्या रेडिओ लहरी दलावरणावरून परावर्तित होतात, म्हणूनच पृथ्वीच्या वक्र-पृष्ठावरून त्या लांबलांबचा प्रवास करूं शकतात. सर्वांत वरचा थर, एक्झोस्फिअर, त्याविषयीं शास्त्रज्ञांना सध्यां फारच थोडी माहिती आहे. परंतु भू-वैज्ञानिक संवत्सरांतील संशोधन व प्रयोग ह्या थरांतील कांहीं रहस्यें तरी उघडकीस आणूं शकतील.

### एकमेकांशीं संबंधित जागतिक घटना

पृथ्वीचा पृष्ठभाग व अंतर्भाग, सागर व त्यांची खोली, पृथ्वीचा सूर्याशीं व चंद्राशीं संबंध, इत्यादींचा समावेश संशोधनाच्या कक्षेत होईल. वादळांच्या मार्गाचा अंदाज, हवामानाचे दीर्घकाळ-विषयक बिनचूक अंदाज, बर्फाच्या डोंगरांच्या वितळण्यामुळें तळाशीं असलेल्या वस्तीला धोका, पावसाच्या उघडीपीची पूर्वसूचना, इत्यादि बाबींहि संशोधनाच्या आरासडयांत आहेत. पृथ्वीच्या एका भागांत वादळें झालीं कीं, दुसऱ्या एखाद्या भागांत त्यामुळें थंडीची लाट उसळते आणि त्यामुळें तिसऱ्याच एखाद्या भागांतील सागर खवळून जातो असें कधीं कधीं घडतें. पृथ्वीच्या एखाद्या भागांत अतिशय थंडी पडली, तर दुसरीकडे कडक उष्मा अनुभवण्यास येतो. अशा रीतीनें, ह्या सर्व घटना जागतिक स्वरूपाच्या व एकमेकांशीं संबंधित असतात. म्हणून, त्यांचा अभ्यासहि साकल्यानें व सहकार्यानें व्हावयास हवा.

### अजूनहि बरेंच अज्ञान आहे

पृथ्वीवर मनुष्याची वस्ती झाल्याला कोट्यावधि वर्षे लोटलीं असलीं, तरी गेल्या कांहीं शतकांतच ह्या ग्रहाविषयीं थोडीशी तपशीलवार माहिती मिळविणें शास्त्रज्ञांना शक्य झालें आहे, आणि त्या माहितीच्या अचूकपणाबद्दल शंभर टक्के खात्री अद्यापहि देतां येत नाहीं. उदाहरणार्थ, ज्या ठिकाणीं खंडें व बेटें नकाशांत दाखविण्यांत येतात, नक्की तेथेंच तीं खरोखर आहेत का? ज्या हवामानावर आपण अवलंबून आहों त्याची आपणांस फारच थोडी माहिती आहे. पाण्यानें व्यापलेल्या पृथ्वीच्या ७० टक्के पृष्ठभागाबद्दल तर बरेंचसें अज्ञानच आहे.

### आंतरराष्ट्रीय योजना व सहकार्य

जागतिक व्यापाचे हे प्रश्न व त्याविषयक प्रयोग व संशोधन ह्यांस लागणारें आर्थिक सामर्थ्य व शास्त्रज्ञांचें मनुष्यबळ कोण-त्याहि एखाद्दुसऱ्या वैयक्तिक राष्ट्राजवळ कोठून असणार? तसेंच इतर राष्ट्रांच्या हद्दींत संशोधनकेंद्रें कशीं स्थापन करता येणार? त्यासाठीं आंतरराष्ट्रीय योजना व सहकार्य हीं आवश्यक आहेत. जुलै १९५७ ते डिसेंबर १९५८ ह्या कालखंडांत असा आंतरराष्ट्रीय प्रयत्न केला जाणार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान-विषयक संघटनेनें (वर्ल्ड मिटिऑरॉलॉजिकल ऑर्गनायझेशन) ह्या कामीं महत्वाचा वांटा उचलला आहे.

### दोन 'ध्रुवीय संवत्सरें'

अशा आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या उपक्रमांचें हें पहिलेंच उदा-हरण नाहीं; ह्यापूर्वी दोनदां अशीं संवत्सरें पाळण्यांत आलीं होतीं. १८८२-८३ चें पहिलें आंतरराष्ट्रीय ध्रुवीय संवत्सर आणि १९३२-३३ चें दुसरें आंतरराष्ट्रीय ध्रुवीय संवत्सर. ह्या दोन्ही संवत्सरांत फक्त उत्तर ध्रुवविषयक अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्यांत आलें होतें, त्यांची व्याप्ति मर्यादित होती. परंतु त्यांच्या-पासून झालेली. निष्पत्ति मोलाची ठरली. उदाहरणार्थ, दुसऱ्या ध्रुवीय संवत्सरांतील संशोधनामुळें दलावरणाच्या 'आयनोस्फिअर'-च्या घोंगड्याविषयीं बरीच माहिती मिळाली. "राडार" सार-ख्यांचें मूळ ह्या संशोधनांतच आढळतें. (अपूर्ण)

---

### एक-रुपयाची चलनी नोट

"प्रिन्सिपल सेक्रेटरी, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स" हे शब्द असलेल्या भारत सरकारच्या एक-रुपायाच्या चलनी नोटा लवकरच काढण्यांत येणार आहेत. हा किरकोळ बदल सोडल्यास बाकी इतर सर्व बाबतींत तीं सध्यांच्या नोटेप्रमाणेंच असेल.

---

### ग्रामीण पतपाहणी अहवालाच्या अखेरच्या भागाचें प्रकाशन

अखिल भारतीय ग्रामीण पत पाहणीच्या मार्गदर्शन समितीच्या अहवालापैकी पहिल्या खंडाचा दुसरा भाग रिझर्व्ह बँकेनें नुकताच प्रसिद्ध केला आहे. सबंध खंडास 'सर्व्हे रिपोर्ट' असें संबोधिण्यांत येत असून, नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या द्वितीय भागांत सरकार, सहकारी संस्था, खाजगी यंत्रणा, यांसारख्या कर्जपुरवठा करणाऱ्या विविध यंत्रणांची रचना व कामकाज या संबंधींचा सविस्तर परामर्ष घेतलेला आहे. 'कर्जपुरवठा' परिशिष्टें व प्रश्नावली यांतून संकलित केलेल्या १९५०-५१ या वर्षाच्या याबाबतच्या माहितीनुसारच मुख्यत्वें हा परामर्ष घेण्यांत आलेला आहे. हें प्रकाशन सुमारें ७५० पानी आहे.

## शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी, कर्जें व इन्व्हेस्टमेंट्स

### १९५६ मधील प्रवृत्ति

१९५६ सालीं भारतांतील औद्योगिक उत्पादन ८% नीं वाढलें, परदेशी व्यापारांत ११% वाढ झाली, रेल्वेवहातुक ८% नीं वाढली. किंमतीमधील वाढहि चालू राहून त्यांत १३% चढ झाली. आर्थिक उलाढालींच्या ह्या वाढीमुळें शेड्यूल्ड बँकांकडे कर्जाची मागणी अतोनात येऊं लागली. डिसेंबर, १९५५ मध्यें बँकांच्या कर्जांची रक्कम ६४५ कोटी रु. होती, ती डिसेंबर, १९५६ मध्यें ७९४ कोटी रु. झाली; म्हणजे त्यांत २३% वाढ दिसून आली.

कर्जांत इतकी वाढ झाली, तरी शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी मात्र ८१ कोटी रुपयांनींच, म्हणजे फक्त ८% नीं वाढल्या. सरकारनें मोठ्या प्रमाणावर तुटीची अर्थव्यवस्था करून प्रसृत नोटांची संख्या वाढविली त्यामुळें ठेवींतहि भरघोस वाढ व्हावयास हवी होती. परंतु, परराष्ट्रीय व्यापारांतील तूट वाढत गेल्यामुळें ठेवींत बेताचीच भर पडूं शकली. बँकांकडे कर्जासाठी मागणी वाढत गेली, तशीं त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडून अधिकाधिक कर्जें घेण्यास प्रारंभ केला, इन्व्हेस्टमेंट्स विकण्याची प्रवृत्ति वाढली आणि सर्व प्रकारच्या ठेवींवर वाढत्या दरानें व्याज देण्यांत येऊं लागलें. ठेवींत वाढ झाली, ती मुख्यतः मुदतीच्या व सेव्हिंग्ज ठेवींतच झाली. बँकांच्या इन्व्हेस्टमेंट्मध्यें ११ कोटी रु. ची घट झाली.

**शे. बँकांकडील ठेवी ( कोटी रु. ) व एकूणशीं प्रमाण**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डिमांड ... | डिसेंबर | १९५४ | ४६४.७ | ५१.१ |
| | ” | १९५५ | ४९४.० | ५०.० |
| | ” | १९५६ | ५२२.२ | ४८.६ |
| सेव्हिंग्ज ... | डिसेंबर | १९५४ | १४६.५ | १६.१ |
| | ” | १९५५ | १६२.५ | १६.४ |
| | ” | १९५६ | १८३.७ | १७.१ |
| टाईम ... | डिसेंबर | १९५४ | २९८.८ | ३२.८ |
| | ” | १९५५ | ३३४.१ | ३३.६ |
| | ” | १९५६ | ३६९.० | ३४.३ |
| एकूण ... | डिसेंबर | १९५४ | ९०९.९ | १००.० |
| | ” | १९५५ | ९९३.७ | १००.० |
| | ” | १९५६ | १०७४.८ | १००.० |

**शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें ( लक्ष रु. )**

| | १९५३ | १९५४ | १९५५ | १९५६ |
|---|---|---|---|---|
| कारखाने ... | १६६,५३ | १९०,८९ | २२०,९६ | ३०५,५३ |
| व्यापार ... | २४९,९७ | २७७,८७ | ३२३,१७ | ३७९,८१ |
| शेती ... | ११,९० | ४,५२ | ११,३० | १३,८५ |
| वैयक्तिक व्यावसायिक... | ४३,४४ | ४७,५६ | ५५,३८ | ६७,४९ |
| इतर ... | २५,८३ | ३६,१३ | ३४,१२ | २९,८७ |
| एकूण ... | ४९७,६७ | ५५६,९७ | ६४४,९४ | ७९३,५५ |

**भारतांतील शेड्यूल्ड बँकांची इन्व्हेस्टमेंट**

| | ( कोटी रु. ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५४ | | १९५५ | | १९५६ | |
| | रक्कम | एकूणशीं % | रक्कम | एकूणशीं प्रमाण | रक्कम | एकूणशीं प्रमाण |
| ( अ ) सरकारी रोखे | | | | | | |
| (१) मध्यवर्ती ... ... | ३२२.४० | ७७.७ | ३४५.०० | ७६.१ | ३११.७३ | ७०.५ |
| (२) राज्यें ... ... | ३४.९५ | ८.४ | ५०.९१ | ११.२ | ६५.८७ | १४.९ |
| (३) इतर ... ... | ०.१८ | — | ०.१८ | — | ०.१७ | — |
| ( अ ) ची बेरीज ... ... | ३५७.५३ | ८६.४ | ३९६.०९ | ८७.३ | ३७७.७७ | ८५.४ |
| ( ब ) हिंदी रोख्यांतील इतर गुंतवणूक | | | | | | |
| (१) इतर ट्रस्टी रोखे ... ... | १०.७७ | २.६ | १३.८६ | ३.१ | १५.५० | ३.५ |
| (२) मुदती ठेवी ... ... | ३.५२ | ०.९ | ३.३७ | ०.७ | ३.२९ | ०.७ |
| (३) कंपन्यांचे शेअर्स व डिबेंचर्स ... | ११.२६ | २.७ | ११.८६ | २.६ | ११.२२ | २.५ |
| (४) मालमत्ता ... ... | ६.५४ | १.६ | ६.८० | १.५ | ६.७९ | १.५ |
| (५) सोनें–चांदी ... ... | ०.०२ | — | ०.०२ | — | ०.०२ | — |
| (६) इतर ... ... | ०.३५ | ०.१ | ०.३९ | ०.१ | ०.१४ | — |
| ( ब ) ची बेरीज ... ... | ३२.४६ | ७.८ | ३६.३० | ८.० | ३६.९६ | ८.४ |
| ( क ) इतर रोखे ... ... | | | | | | |
| (१) पाकिस्तानी ... ... | ९.१५ | २.२ | ५.९४ | १.३ | ०.५१ | ०.१ |
| (२) ब्रिटिश सरकारचें ... ... | ५.४१ | १.३ | ५.७३ | १.३ | २.९३ | ०.७ |
| (३) इतर ... ... | ९.३१ | २.२ | ९.४७ | २.१ | ९.४१ | ०.१ |
| ( क ) ची बेरीज ... ... | २३.८६ | ५.८ | २१.१४ | ४.७ | ३.८५ | ०.९ |
| ( अ ) + ( ब ) + ( क ) ... | ४१३.८५ | १००.० | ४५३.५३ | १००.० | ४१८.५८ | ९४.६ |
| ( ड ) हिंदी बँकांच्या विदेशी शाखांची गुंतवणूक ... ... | — | — | — | — | २३.८१ | ५.४ |
| एकूण (अ) + (ब) + (क) + (ड) | ४१३.८५ | १००.० | ४५३.५३ | १००.० | ४४२.३९ | १००.० |

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७८,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — म. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : —श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



## સુખી જીવનની પગદંડી

( ગૃહજીવનનું માંગલ્ય )

લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, " અર્થ "

ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂા. ૧–૮–૦



## * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे — उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३३,१३५ |
| खेळतें भांडवल ... ... | रु. ६२,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २। टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.